Exh. 7

रे.क.नं. ४२/२०२६

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल
# यांचे न्यायालयात ......

**श्री. रत्नाकर दौलू लोहार,**
व.व.८०, धंदा : पेन्शनर,
रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर } वादी

विरूद्ध

१) **श्री. संजय बाजीराव लोहार**
व.व. ४८, धंदा : शेती,
२) **श्री. संपत बाजीराव लोहार**
व.व. ४५, धंदा : शेती,
दोघेही रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर } प्रतिवादी

सी.पी.सी.ऑर्डर ३९ रूल २(अ) प्रमाणे
तसेच कलम १५१ प्रमाणे अर्ज

यातील वादीतर्फे विनंती अर्ज की,

१) यातील वादींनी दि. १२/०३/२०२६ इ. रोजी प्रस्तूतचा कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे. तसेच सदर कामी नि. ५ तुर्तातुर्त मनाई अर्ज दाखल केलेला आहे. सदरचे अर्जावर मे. कोर्टानी दि. १६/०३/२०२६ इ. रोजी तुर्तातुर्त मनाई आदेश पारित केलेला आहे.

२) वरीलप्रमाणे परिस्थिती असताना, यातील प्रतिवादी यांना सदर दावेच्या सी.पी. सी.ऑर्डर ३९ रूल १ व २ प्रमाणे रितसर रजि. पोस्ट नोटीस पाठविलेली

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

असून सदर आदेशाची पोस्टाद्वारे प्रत प्रतिवादीस दि. १८/०३/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. असे असतानाही, यातील प्रतिवादींनी अनाधिकाराने बेकायदेशीर व गुंडगिरीच्या जोरावर दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून बांधकाम सुरूच ठेवलेले होते व आहे. अलाहिदा, त्याबाबत यातील वादी यांनी मे. मुरगूड पोलीस स्टेशन, मुरगूड यांचेकडे दि. २०/०३/२०२६ इ. रोजी रितसर तक्रार दाखल केलेली आहे.

३) सदरची तक्रार दिली असतानाही, यातील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीररित्या सेंट्रिंगचे सळ्या बांधण्याचे काम सुरूच ठेवलेले होते व आहे. दरम्यान, दि. २४/०३/२०२६ इ. रोजी मे. कोर्टामार्फत बेलीफ यांनी प्रतिवादीस रितसर नोटीस व मनाई आदेश लागू केलेला आहे. तरीही यातील प्रतिवादी यांनी गुंडगिरीच्या जोरावर दावा मिळकतीमध्ये दि. २९/०३/२०२६ इ. रोजी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करून स्लॅब टाकलेला आहे. सदरचे प्रतिवादीचे कृत्य बेकायदेशीर असून वादी यांचे हक्क व अधिकारावर गदा आणणारे आहे. प्रतिवादी यांनी मे. कोर्टाचे आदेशाची अवज्ञा केलेली आहे. यातील प्रतिवादी यांनी मे. कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन करून कायदा हाती घेणेचा प्रयत्न केलेला आहे. तसेच प्रतिवादी यांनी न्यायालयाचे मनाई हुकूमाचे उल्लंघन करून गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे. त्यामुळे यातील प्रतिवादी हे शिक्षेस व दंडास पात्र आहेत.

४) सबब, यातील प्रतिवादी यांनी मे. न्यायालयाच्या मनाईचे हुकूमाचे उल्लंघन केले असलेमुळे यातील प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड व दिवाणी तुरूंगात डांबून ठेवणेबाबत आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

कागल

दि. १०/०४/२०२६

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

**प्रतिज्ञा**

मी यातील वादी रत्नाकर दौलू लोहार, व.व.८०, धंदा – पेन्शनर, रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःच्या माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि. १०/०४/२०२६

**ॲफिडेव्हिट**

मी यातील वादी रत्नाकर दौलू लोहार, व.व.८०, धंदा – पेन्शनर, रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट. आज मु।। कागल

दि. १०/०४/२०२६

मी ॲफिडेव्हिट करणार यांना ओळखतो.

ॲड. एस. एम. तिवडेकर

**प्रतिज्ञा**

मी यातील वादी रत्नाकर दौलू लोहार, व.व.८०, धंदा – पेन्शनर, रा. निढोरी, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःच्या माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल

दि.१०/०४/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri रत्नाकर दौलू लोहार
व व ८० रा. निढोरी ता. कागल
Identified by Shri वकील S. M. तिवडेकर
whom I know personally
Dated · 10/04/2026

Assistant Superintendent

रे.क.नं. ४२/२०२६

# मे. दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, कागल
# यांचे कोर्टात......

श्री. रत्नाकर दौलू लोहार .......... वादी

विरूद्ध

श्री. संजय बाजीराव लोहार, वगैरे ........... प्रतिवादी

यातील वादीतर्फे हजर कागदयादी खालीलप्रमाणे –

| अ.नं. | तपशिल | तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| १ | दावा मिळकतीचा फोटो | १७/०३/२०२६ | अस्सल |
| २ | दावा मिळकतीचा फोटो | १९/०३/२०२६ | अस्सल |
| ३ | दावा मिळकतीचा फोटो | २०/०३/२०२६ | अस्सल |
| ४ | दावा मिळकतीचा फोटो | २८/०३/२०२६ | अस्सल |
| ५ | दावा मिळकतीचा फोटो | २९/०३/२०२६ | अस्सल |
| ६ | दावा मिळकतीचा फोटो | ३१/०३/२०२६ | अस्सल |

येणेप्रमाणे ६(सहा) कागद दाखल असे.

कागल
दि. १०/०४/२०२६

वादीतर्फे वकील


अ.क्र.१

गु.र.नं. ४२/२०२६

मे. न्यायालयात [illegible] दाखल ता.

१०/३/२०२६

(अ)




अ.क्र.2



आ.नं. ३.




आ.नं ४



फो.नं.५




फो.नं.६




MADKE AJIT BHISHMA

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.04.10 17:55:16 +0530